बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE **-020 :**25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495

**वृत्तपत्रीय निवेदन**

बँक ऑफ महाराष्ट्र तर्फे 73वा प्रजासत्ताक दिवस साजरा

पुणे 27 जानेवारी 2022 **:** देशाच्या सार्वजनिक बँकिंग क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या मुख्य कार्यालयात देशाचा 73वा प्रजासत्ताक दिवस दिनांक 26 जानेवारी रोजी साजरा करण्यात आला. बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी ध्वजारोहण केले व त्यानंतर राष्ट्रगीताचे गायन करण्यात आले. कार्यकारी संचालक श्री ए बी विजय कुमार व श्री आशीष पांडे यांचे सह बँकेचे सर्व सरव्यवस्थापक, कार्यकारी अधिकारी व कर्मचारी या झेंडावंदन कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमास संबोधित करताना बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव यांनी आपल्या पूर्वजांनी स्वातंत्र्य लढ्यात केलेल्या बलिदानाचे व त्यागाचे स्मरण केले व त्यांच्याच अथक प्रयत्नाने एक सर्वोत्तम राज्यघटना तयार करून देशाची सर्व क्षेत्रात प्रगतिची घोडदौड सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. सन 2021 -22 या वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत रु 3.15 लाख कोटी व्यवसायाचे लक्ष्य पूर्ण केल्याबद्दल व त्यायोगे बँक ऑफ महाराष्ट्राला मध्यम आकाराची बँक करण्यात घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांनी बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले**.**

प्रत्येकाने आपल्यातील सर्वोत्तम योगदान बँक व देशाच्या प्रगतिसाठी देण्याचे या प्रसंगी आवाहन केले व या 73व्या प्रजासत्ताक दिवसाच्या मंगल प्रसंगी सर्वांना शुभेच्छा दिल्या व प्रत्येकाच्या जीवनात सतत आनंदाचा अनुभव येवो अशी सदिच्छा व्यक्त केली .

कार्यकारी संचालक श्री ए बी विजय कुमार व श्री आशीष पांडे यांनी बँकेची समर्पित वृत्तीने सेवा केल्याबद्दल व प्रजासत्ताक दिवशीच्या समारंभाचे नीटनेटके व भव्य प्रमाणावर उत्तम आयोजन केल्याबद्दल सुरक्षा रक्षकांचा सत्कार केला.

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बैंक

Corporate Communications & Investor Relations
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE **-020 :**25614495, 25614366, 25514501 to 12 Extn. 495



**छायाचित्रात :** बँक ऑफ महाराष्ट्रचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए एस राजीव कार्यक्रमाला संबोधित करताना.त्यांच्या डावीकडे नियोजन विभागाचे सरव्यस्थापक श्री व्ही एन कांबळे व कार्यकारी संचालक व श्री आशीष पांडे व श्री ए बी विजय कुमार दिसत आहेत